# पुरुष जन्मा ही
# तुझी कहाणी !

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**पुरुष जन्मा ही तुझी कहाणी ! : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २००/-

# पुरुष जन्मा ही तुझी कहाणी !

## १

सुनंदा तात्यांकडे बघत नव्हती, पण तरी देखील तिला कळत होतं की श्रीधरविषयी तिचं मत काय होत होतं त्याचा अदमास तिच्या चर्येवरून ते घेत होते...

श्रीधर तिला आवडेल अशी त्यांची अपेक्षा असावी. तो तिला आवडावा अशी त्यांची इच्छा तर खचितच होती...

दोन दिवसांपूर्वी सकाळी बाजारात फेरफटका करून ते खोलीवर आले होते तेव्हा त्यांनी श्रीधरला बरोबर आणलं होतं. त्यांची आणि सुनंदाची ओळख करून देताना ते म्हणाले होते, ''बाजारपेठेतून रमतगमत चाललो होतो. तेव्हा यांनी मला हाक मारली. जवळ येऊन म्हणाले, तुम्ही मला ओळखणार नाही. पूर्वी कधी भेटच झाली नाही, तेव्हा ओळखणार कसे? पण मी मात्र तुम्हांला ओळखतो. वृत्तपत्रांत आणि मासिकांत तुमचे फोटो बघितले आहेत मी. तुमच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या मी वाचल्या आहेत. तुमचा अभिमान धरणाऱ्या तुमच्या चाहत्यांपैकी मी एक आहे. माझे वडील भाऊसाहेब धारप शाळेत आणि नंतर कॉलेजातही तुमचे वर्गबंधू आणि विशेष मित्र होते. त्यांची तुमची कित्येक वर्षात गाठभेट झालेली नाही. कशी होणार? आमचे भाऊ इथे महाराष्ट्रात वकिली करण्याऐवजी चांद्याला येऊन वकिली करू लागले. आमचं घर चांद्याला, तुम्ही इकडे मुंबईत. पण भाऊ नेहमी तुमच्या आठवणी सांगत असतात. तुम्हाला एकदा बघावं, तुमच्याशी काही बोलता आलं तर बोलावं अशी माझी फार दिवसांची इच्छा होती. काही कामासाठी पुण्याला आलो होतो. म्हटलं पुण्यास आलोच आहोत तर महाबळेश्वर बघावं. तुमचा मुक्काम इथे असेल

अशी कल्पना नव्हती. पण अचानक तुम्ही दृष्टीस पडलात. मग म्हटलं बरं दिसो अगर वाईट दिसो, तुमच्यापुढे येऊन नमस्कार ठोकायचाच. धारिष्टाबद्दल क्षमा करा. तुमची गाठ पडली, फार आनंद झाला. आजचा दिवस सोन्याचा म्हणून लिहून ठेवीन मी डायरीत. मी यांच्याकडे निरखून पाहिलं आणि म्हणालो, ''भाऊ धारपांचे चिरंजीव काय तुम्ही? वा वा, वा! फार आनंद झाला तुमच्या भेटीचा. अगदी बापासारखे दिसता हो तुम्ही! किती शिकला आहात?...'' बाजारातल्या गर्दीतच हे आणि मी बोलत उभे राहिलो. मग मी त्यांना म्हणालो, 'आमच्या खोलीवर चला. 'आराम'मध्ये उतरलो आहोत आम्ही. आमची सुनंदाही आली आहे. पहिल्यांदाच येते आहे महाबळेश्वर पाहण्यासाठी. तुमचा आणि तिचा परिचय व्हायला हवा. चला. घेऊन आलो यांना.'

'चांगलं केलंत.' असं सुनंदा म्हणाली. तिनं श्रीधरकडे बघून नमस्ते केलं आणि 'फार आनंद झाला' असं औपचारिक काही तरी पुटपुटून हास्य केलं.

मग श्रीधर पुष्कळ वेळ बसला होता. तो जायला निघाला तेव्हा तात्यांनी पुन्हा येण्याविषयी त्याला बजावलं... नंतरच्या तीन दिवसांत तात्या, श्रीधर आणि सुनंदा अशी तिघेजण मिळूनच सकाळ-संध्याकाळ फिरायला गेली. शिवाय गप्पा मारण्यासाठी म्हणून श्रीधर खोलीवर येत राहिला. त्याची पुष्कळच माहिती त्याच्या बोलण्यावरून सुनंदाला कळली...

त्याचं घर चांद्याला होतं. कॉलेजातले शिक्षण नागपुरात झालं होतं. आता 'इरिगेशन' खात्यात त्याला चांगली नोकरी होती... अघळपघळ बोलण्याचा त्याचा स्वभाव होता. राजकारणाच्या विषयात मात्र त्याला रस नव्हता. तो विषय निघालाच तर तो म्हणे, गांधीवाद आता उरलाच आहे कुठे? गांधींच्या अनुयायांनी तो केव्हाच निकालात काढून टाकला आहे. पांढऱ्या अभ्र्यातल्या सत्ताधाऱ्यांकडून लोकांचं काही भलं होईल अशी आशा ठेवायला जागाच नाही. पण काँग्रेसवाल्यांना खुर्चीवरून ओढायचं ठरविलं तर अमक्या पक्षाला खुर्चीवर बसवा असं म्हणायची सोय कुठे आहे? सारेच पक्ष संधीसाधू लबाड आहेत... तो वारंवार म्हणे, 'शौक करावासा वाटतो फक्त दोन गोष्टींचा. व्यायाम आणि वाचन.' तात्यासाहेबांच्या एकेका कादंबरीतले संदर्भ तो असे काही चटाचट सांगत असे की जणू त्यांच्या कादंबऱ्या त्यानं मुखोद्‌गत गेल्या होत्या.



त्याचा सहवास कुणालाही सुखाचाच व्हावा असा तो होता... सुनंदाला श्रीधर आवडला यात आश्चर्य नव्हतं.

परंतु खोलीत गप्पागोष्टी करताना काय किंवा बाहेर हिंडताना काय तात्या सुनंदाच्या चर्येकडे ज्या नजरेनं बघत असल्याचं तिच्या लक्षात येई त्या नजरेनं तिला आश्चर्य वाटत असे, आणि ती थोडी अस्वस्थही होत असे. लग्नाच्या दृष्टीनं श्रीधर तिला पसंत पडावा अशी त्यांची इच्छा असल्याप्रमाणे ते आपल्या प्रतिक्रियेचा अंदाज घेत आहेत असं सुनंदाला वाटे...

आता विल्सन पॉईंटच्या पठारावरच्या एका बुरुजावर बसून ती तिघेजण सूर्यास्ताची शोभा बघत होती. संध्याकाळचा गार वारा अंगावर घेता घेता गप्पा करीत होती... बोलण्याच्या ओघात तात्या म्हणाले होते, 'महाबळेश्वर, माथेरान, उटकमंड, सिमला, दार्जिलिंग अशा थंड हवेच्या ठिकाणांची आपण मजा लुटतो. पण ही सारी ठिकाणं साहेबांनी प्रथम शोधून काढली, वाढविली, नावारूपाला आणली, सामान्य माणसाला देखील तिथे जाता यावं, राहता यावं, अशा सुखसोई निर्माण केल्या. साहेब नसते तर ही सारी रम्य स्थळं अज्ञात राहिली असती. आम्ही लोकांनी ती शोधून काढली असती असं वाटत नाही...' तात्यांचा हा सिद्धान्त श्रीधरला पटला नव्हता. तो खोडून काढण्यासाठी तो आवेशानं बोलत होता. त्याला निरुत्तर करण्यासाठी तात्यांनी सवाल टाकला होता, 'आहो, फार कशाला, नव्या दिल्लीची राजधानी साहेबांनी बांधली म्हणूनच झाली. इतकी सुंदर नगरी आपल्या लोकांनी निर्माण केली असती का, सांगा मला !... मुस्लीम राज्यकर्ते आणि इंग्रज राज्यकर्ते यांनी शिल्पकलेचे आणि वास्तुकलेचे जसे भव्य आणि सुंदर नमुने उभे करून देशाची शान वाढविली तसे मराठ्यांचं आणि पेशव्यांचं राज्य असताना त्यांनी निर्माण केले काय? दिल्ली-आग्रा येथील किल्ले आणि त्या किल्ल्यांतल्या दरबाराच्या आणि प्रार्थनेच्या जागा पाहताना माझ्या मनात असा विचार आला की मुसलमान राज्यकर्ते आणखी काही दिवस राहिले असते तर त्यांनी दिल्लीपासून लंडनपर्यंत पूल तरी बांधला असता किंवा भुयारी रस्ता तरी तयार केला असता!'... तात्यांची ती कल्पना ऐकून श्रीधर हसला होता, सुनंदाही हसली होती. तिच्याकडे बघतच श्रीधर म्हणाला होता, 'तुम्ही सिद्धहस्त कादंबरीकार आहात. तुमच्यापुढे आम्ही काय बोलणार? परंतु तुमचा सिद्धान्त मात्र आम्हाला पटत नाही. एकांगी

वाटतो'... मग तो आणखी आवेशानं बोलत राहिला. सुनंदाला तात्यांचं विधान खरं वाटत होतं. परंतु श्रीधरच्या बोलण्याला उत्तेजन देण्यासाठी ती मधून मधून टेकू देत होती.

एकीकडे त्या दोघांच्या वादात सामील झाल्याप्रमाणे बोलताना सुनंदाला सारखी जाणीव होत होती की तात्या कसला तरी अदमास घेत होते. श्रीधर तिला कितीसा आवडतो ते बघत होते... तो तिला पसंत पडावा अशी त्यांची अपेक्षा होती. इच्छा तर खचितच होती...

तात्यांचं ते पाहणं सुनंदाला नकोसं वाटत होतं. ती मनातल्या मनात नाराज झाली होती... मुलामुलींची लग्नं जुळविण्यासाठी वयस्कर बायका कशी उत्सुक असतात आणि त्यासाठी कशा खटपटी लटपटी करतात त्याची विनोदपूर्ण वर्णनं इंग्रजी आणि मराठी कथांतून तिनं वाचली होती. त्यांची आठवण तिला होत होती. तिच्या मनात येत होतं, तात्या पुरुषासारखे पुरुष पण ते देखील आपल्या लेकीच्या लग्नासाठी इतके उत्सुक असावेत...

हा प्रश्न सुनंदाच्या मनात आत्ताच येत होता असं नव्हे. जवळजवळ गेल्या वर्षभर हा प्रश्न ती स्वत:ला विचारीत होती.

त्यांना स्वत:ला आवडलेला एखादा तरूण पुरुष तिलाही आवडेल, त्याच्यावर तिचं प्रेम जडेल असं त्यांना वाटलं की ते त्याला घरी घेऊन येत असत. त्याचा तिच्याशी परिचय करून देत असत, तो वाढावा म्हणून प्रयत्न करीत असत, आणि त्यांची ती खटपट यशस्वी झाली नाही की त्याची खंत वाटून घेत असत... पुष्कळदा तिला आश्चर्य वाटे की, आपल्या लग्नाची चिंता आपली आई करीत नसेल इतकी तात्या करतात, हे काय आश्चर्य म्हणायचं?

माधव मराठे, दत्ता दामले, जयंत जोगळेकर असे जे जे तरुण राधाबाईना (म्हणजे सुनंदाच्या आईला) किंवा तात्यांना, किंवा दोघांनाही आवडले होते त्यांचा आणि सुनंदाचा परिचय त्यांनी करून दिला होता. सुनंदाला ते आवडतील, त्यांच्यावर तिचं प्रेम बसेल अशी अपेक्षा त्यांनी केली होती. परंतु त्यांच्या खटपटीतून काहीच निष्पन्न झालं नव्हतं. त्यांच्यापैकी कुणावरही सुनंदाचं प्रेम बसलं नव्हतं. का बसलं नव्हतं ते सुनंदाला सांगता येत नव्हतं. कारण तिचं तिलाच ते कळलं नव्हतं.



खरं पाहिलं तर ते तिघे तरुण आपापल्या परीनं चांगले होते. माधव मराठे सचिवालयात मोठ्या हुद्द्यावर होता. दिसायला काळासावळा परंतु देखणा होता. एम.ए. होता. खानदान कुटुंबातला होता. स्वभावानं काहीसा अबोल पण प्रेमळ होता. दत्ता दामले एका मोठ्या कॉलेजात प्रोफेसर होता. रसिक होता. बोलण्यात चतुर होता. जयंत जोगळेकर इंजिनिअर होता. पुण्यास किर्लोस्कर कारखान्यात मोठ्या पगाराच्या जागेवर होता. स्वभावानं जरा गंभीर होता. परंतु त्याच्या अंगी खिलाडूपणाही थोडाफार होता.

असे हे एकेक तरुण तिच्या परिचयाचे झाले होते. परंतु त्यापैकी कुणावरही सुनंदाचं प्रेम बसलं नव्हतं... 'याच्याशी लग्न करणं तुला आवडेल का?' असा प्रश्न प्रत्येकाच्या बाबतीत राधाबाईंनी आणि तात्यांनी सुनंदाला विचारला होता. आणि दरवेळेस तिनं उत्तर दिलं होतं, 'नाही आवडणार !' मग तात्या उद्‌गार काढीत असत, 'मग तुझं लग्न व्हायचं कसं?'

सुनंदा म्हणत असे, 'होईल हो तात्या. तुम्ही इतकी चिंता कशाला करता?'

एकदा सुनंदाचा हा प्रश्न ऐकल्यावर तात्या म्हणाले होते, 'मुलीचं लग्न म्हणजे आईबापांना मोठ्या चिंतेचा विषय वाटत असतो. मुलामुलींनी प्रेमविवाह करावा, आईबापांनी त्यांच्या प्रेमाकडे सहानुभूतीनं बघावं, हे सारं बोलायला सोपं आहे. माझ्या कथा कादंबऱ्यांतून हे तत्त्वज्ञान लिहितोच की मी. परंतु ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याची वेळ आली की ते पुस्तकी तत्त्वज्ञान लटपटायला लागतं. एक तर मुलामुलींचं प्रेम जमणं ही गोष्टच मुळी आपल्या समाजात सोपी नाही. चांगल्या मुलींना चांगले पुरुष भेटतील असा संभवच फार थोडा असतो. आपल्या मुलीनं चांगला मुलगा हेरून काढावा, त्याच्यावर प्रेम करावं, त्याचं प्रेम आपल्यावर बसेल अशा धोरणानं वागावं, आणि तिनं निवडलेल्या पुरुषाशी लग्न करण्याची परवानगी आईबापांनी द्यावी, ह्या साऱ्या गोष्टी कागदावर लिहायला किंवा तोंडानं बोलायला सोप्या वाटतात. पण त्याप्रमाणे वागण्याची आईबापांची तयारी असली तरी अशी वेळ क्वचितच येते. कारण चांगल्या मुलांची आणि चांगल्या मुलींची गाठच फार क्वचित पडते. मग मुलीच्या लग्नाची आईबापांची चिंता चालू राहाते. वयानं वाढणाऱ्या मुलींकडे बघून त्यांना पदोपदी वाटू लागतं की भलत्या कुणाच्या प्रेमात तर ही आपली लाडकी लेक सापडणार नाही? मग साहजिकपणे ती कुणाशी मैत्री

जोडते, कुणाबरोबर हिंडते-फिरते कुठे जाते, केव्हा जाते, घरी केव्हा येते याकडे संशयाच्या आणि चिंतेच्या नजरेनं आई-बाप बघू लागतात. आपल्या मुलीला चांगले तरुण भेटावेत, त्यांची आणि तिची ओळख व्हावी, शक्य तर तिला ते आवडावेत असा प्रयत्न आईबाप करू लागतात. तो केल्यावाचून कसं राहावेल त्यांना?...

तात्याचं हे बोलणं सरळच होतं. सुनंदाला पटण्यासारखं होतं... माधव मराठे, दत्ता दामले, जयंत जोगळेकर अशा तरुणांशी तात्यांनी सुनंदाचा परिचय कोणत्या हेतूनं करून दिला होता ते सुनंदाला समजत का नव्हतं? यापैकी एखाद्या तरुणावर तिचं प्रेम जडलं असतं तर तिच्या आईबापांना आनंद झाला असता, ती दोघे चिंतामुक्त झाली असती, हे देखील सुनंदाला कळत होतं... परंतु हे सारे तरुण पुरुष तिला चांगले वाटले होते, मित्र म्हणून आवडले होते तरी त्यापैकी कुणावरही तिचं प्रेम बसलं नव्हतं, त्याला ती काय करणार? प्रेम बसवायचं म्हणून बसविता थोडचं येतं!

आता महाबळेश्वरच्या मुक्कामात तात्यांनी श्रीधरला कोणत्या हेतूनं मुद्दाम घरी आणलं होतं ते सुनंदानं ओळखलं होतं... श्रीधर सर्व दृष्टींनी चांगला तर होताच पण शिवाय आपल्या जुन्या मित्राचा तो मुलगा या विचारानं तात्यांना तो विशेष आवडला असला पाहिजे. आपलं प्रेम श्रीधरवर बसलं तर तात्यांना विशेष आनंद होणार आहे ही गोष्ट सुनंदानं केव्हाच ओळखली होती...

आत्ता विल्सन पॉइंटच्या पठारावरच्या एका बुरुजावर ती तिघेजण हवा खात बसली होती, गप्पा मारीत होती, वाद घालीत होती, तेव्हा देखील तात्यांकडे न पाहाताही सुनंदाला कळत होतं, की श्रीधर आपल्याला कितीसा आवडतो, त्याच्याविषयी आपल्या मनात कितीसं आकर्षण निर्माण झालं आहे, याचा अदमास ते सारखा घेत होते. ती संभाषणात भाग घेत होती, हसत होती बोलत होती. परंतु तात्यांच्या मनातली खरी इच्छा कोणती होती त्याचा विचार आला की सुनंदा अस्वस्थ होत होती.

श्रीधरची रजा संपली म्हणून दुसऱ्या दिवशी महाबळेश्वरचा मुक्काम आटोपून तो नागपूरला निघून गेला.

त्या दिवशी संध्याकाळच्या रपेटीला तात्या आणि सुनंदा दोघंच गेले. चालता चालता तात्या म्हणाले, 'आज श्रीधर नाही आपल्याबरोबर.'

सुनंदा नुसतं म्हणाली, 'हूं'.



'त्याची संगत चांगली होती नाही?'

'हूं'.

'बोलण्यात, वाद घालण्यात मोठा चतुर वाटला मला श्रीधर.'

'हूं'.

'महाबळेश्वर सोडणं त्याच्या जिवावर आल्यासारखं दिसलं, नाही?'

'असं?'

'तुला कसा काय वाटला श्रीधर? आवडला का?'

त्यांच्या या प्रश्नाचं उत्तर सुनंदानं लगेच दिलं नाही. काही न बोलता ती त्यांच्याबरोबर पावलं टशकीत राहिली... म्हणून तात्यांनी तिला पुन्हा विचारलं, 'श्रीधर आवडला की नाही तुला? सांग ना?'

सुनंदा म्हणाली, 'मला श्रीधर आवडला. आवडावा असाच तो आहे. परंतु ज्या अर्थाने तुम्ही विचारीत आहात त्या अर्थानं तो आवडला नाही.'

तिचं ते उत्तर ऐकून तात्यांना आश्चर्य वाटलं असावं, वाईटही वाटलं असावं, हे सुनंदानं ओळखलं.

परंतु ते काही बोलले नाहीत. स्तब्ध राहून ते चालत राहिले.

सुनंदा म्हणाली, 'तात्या, माझ्या मनातला एक विचार तुम्हाला स्पष्टपणानं सांगावा की नाही हे मला ठरविता येत नाही. पण आता तो तुम्हाला आणि आईलाही सांगून टाकला पाहिजे असं मला वाटतं. गेल्या वर्षात तुम्ही दोघांनी माझ्या लग्नाची खटपट केलीत. अनेक तरुण पुरुषांशी माझा परिचय करून दिलात. ते सगळेच चांगले होते. त्यांच्यापैकी कुणीतरी मला आवडेल, आणि त्याच्याशी लग्न करायला मी तयार होईन असा तुमचा हिशोब होता. तुमचा विचार बरोबरच होता. पण मला कुणीच आवडलं नाही. तुम्हा दोघांना माझ्या नकाराचं वाईट वाटत होतं. आश्चर्यही वाटत होतं. कोणताही तरुण पुरुष मला का पसंत पडत नव्हता ते तुम्ही दोघांनी मला खोदून विचारलं नाही. मीही तुम्हाला सांगितलं नाही. पण मला वाटतं आता ते सांगायला हवं. लग्नाच्या बाबतीत माझी भूमिका काय आहे ते तुम्हाला कळायला हवं. ज्या तरुणाशी तुम्ही माझी ओळख करून देत होता ते सगळेच चांगले होते. रूपानं बरे होते. चांगल्या कुटुंबातले होते. आर्थिकदृष्ट्या सुस्थितीतले होते. पण असं असून देखील त्यापैकी कुणाचंही विशेष आकर्षण मला वाटलं नाही. का